# युरोपचा पाठिंबा

आपणच केलेली चुकीची कामे आपल्यासाठीच कशी त्रासदायक ठरतात, हा धडा युरोपीय देशांना मिळाला आहे. कारण त्यांनी इतकी वर्षे निसर्गाची हानी केल्यामुळेच ग्लोबल वॉर्मिंग व हवामानबदलाची समस्या उभी राहिली आहे. त्याचा या देशांनाच मोठा बसण्याची शक्यता आहे. म्हणूनच इंग्लंड, जर्मनी, फ्रान्स असे बहुतांश युरोपीय देश आता जागे झाले आहेत आणि हवामानबदल रोखण्यासाठी गांभीर्याने प्रयत्न करायला हवेत, असे ओरडून सांगत आहेत. त्यांनी अशी भूमिका घेण्याला अनेक कारणे आहेत. त्यापैकी प्रमुख कारण म्हणजे आताच्या गतीने हवामानात बदल झाले तर युरोपसाठी महत्त्वाचा असलेला 'गल्फ प्रवाह' थांबण्याची भीती व्यक्त केली जात आहे. हा अटलांटिक महासागरातील उबदार पाण्याचा प्रवाह आहे. तो विषुववृत्ताकडून ध्रुवीय प्रदेशाकडे वाहतो, वाटेत युरोपमध्ये उबदार वातावरण निर्माण करतो. त्याचा फायदा मुख्यतः हिवाळ्याच्या काळात होतो. कारण त्याच्यामुळे युरोपातील हिवाळा फारसा कडक न राहता तो सहन होण्याजोगा बनतो. पण हवामानबदलांमुळे हाच प्रवाह बंद झाला तर हिवाळ्यात युरोपमध्ये राहणे कठीण बनेल. आणखी एक धोका म्हणजे या परिस्थितीत तिथल्या बहुतांश बंदरातील पाणी गोठण्याची शक्यता आहे. असे झाले तर त्याचा युरोपीय देशांचा व्यापार व सागरी वाहतुकीवर खूपच विपरित परिणाम होणार आहे. ही व अशाप्रकारे असणारी भीती लक्षात घेऊनच युरोपीय देश आता जागे झाले आहेत. खरंतर गेल्या दोनशे-तीनशे वर्षांमध्ये याच युरोपीय देशांनी जगभरात आपले साम्राज्य पसरून सगळीकडच्या पर्यावरणाचा ऱ्हास केला. जंगले तोडली, भरपूर कोळसा जाळला. त्यातूनच आजची हवामानबदलाची समस्या उभी राहिली आहे. आता ही परिस्थिती त्यांच्याच जीवावर उठली आहे. म्हणूनच बहुतांश युरोपीय देश तापमानवाढ रोखण्यासाठी प्रयत्नशील आहेत. हे लवकरात लवकर थांबावे हीच त्यांची भूमिका आहे.



प्रश्न- ग्लोबल वॉर्मिंग व हवामानबदलाचा युरोपवर विपरित परिणाम होण्याची शक्यता आहे का?

(उत्तर- रविवार, ३० नोव्हेंबरच्या अंकात)



MAHARASHTRA
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ
प्रस्तुत
लोकसत्ता गाथा ज्ञानाची




फळभाज्यांसाठी वापर करा कापडी पिशव्यांचा,
दुष्परिणाम ओळखा प्लॅस्टीक पॅकिंगचा

प्लॅस्टीकमध्ये पॅकिंग केलेले पदार्थ वापरल्यास त्यातले जीवनसत्त्वं कमी होऊ शकतात. टाकाऊ प्लॅस्टीक पॅकिंगचा दुष्परिणाम पाणी, जमीन आणि उर्जेवरही होऊ शकतो.



महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ
Website: http://mpcb.mah.nic.in

गुरुवार, दि. २७/११/२००८ सकाळी ७.४० वा. आकाशवाणीच्या अस्मिता वाहिनीवर जागर पर्यावरणाचा कार्यक्रम ऐका.
तज्ज्ञ : गिरीश कुबेर (पत्रकार व लेखक) मुलाखत : रविराज गंधे